# सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नांदेड

रेल्वे स्टेशन रोड, नांदेड - ४३१६०१

dyceogadzpnanded@gmail.com **दुरध्वनी : ०२४६२ - २३४६६८.**


---

जा.क्रं.जिपनां/साप्रवि/आस्था-२ब/१७६७/२०२३

दिनांक : ०२ / ०५ /२०२३

**प्रति,**

१) खाते प्रमुख (सर्व), जिल्हा परिषद नांदेड

२) गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व), जि.नांदेड

**विषय :- सर्वसाधारण बदल्या सन २०२३**
**सहाय्यक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, वरिष्ठ सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक** या संवर्गातील अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या अंतिम वास्तव्य जेष्ठता यादया प्रसिध्द करणे बाबत..

**संदर्भ :** १. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र. जिपब/प्र.क्र.-११२/आस्था-१४ दि. १५/०५/२०१४.
२. शासन शुध्दीप्रत्रक क्र.जिपब/४८१६/ प्र.क्र.-१६/आस्था-१४ दि. ०२/०१/२०१७.
३. शासन पुरकपत्र क्र.जिपब/४८१७/ प्र.क्र.-२२८/आस्था-१४ दि. ०४/०३/२०१९
४. या कार्यालयाचे पत्र जा.क्रं.जिपनां/साप्रवि/आस्था-२ब/१५८३/२०२३ दि. १७/०४/२०२३

उपरोक्त विषयान्वये ग्रामविकास विभागाकडील संदर्भाधीन शासन निर्णय, शुध्दीपत्रक व पुरकपत्रान्वये जिल्हा परिषदेच्या गट - क (वर्ग-३) व गट- ड (वर्ग-४) कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्यांबाबत सुधारित धोरणानुसार निश्चित करण्यात येवून बदल्यांची कार्यवाही पूर्ण करण्याबाबत निर्देश आहेत.

त्याअनुषंगाने खाते प्रमुख (सर्व), जिल्हा परिषद नांदेड व गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व), जि.नांदेड यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त संदर्भ क्र.०४ अन्वये सामान्य प्रशासन विभागाच्या अधिनस्त असलेल्या गट - क (वर्ग-३) सहाय्यक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, वरिष्ठ सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक या संवर्गातील अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या दिनांक ३१/०५/२०२३ रोजीची सेवा ग्रहित धरुन प्रशासकीय बदलीसाठी बदलीपात्र अधिकारी / कर्मचाऱ्यांची संवर्गनिहाय प्राथमिक वास्तव्य ज्येष्ठता याद्या प्रसध्दि करण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर प्राथमिक वास्तव्य ज्येष्ठता यादीमध्ये संबधितांच्या नावासमोर घेण्यात आलेल्या नोंदी बाबत काही हरकती/सुचना/ आक्षेप/ व तक्रारी असल्यास त्या यादी प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून २७/०४/२०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत संबधिताच्या कागदपत्राच्या पुरावासह सादर करावेत. विहित मुदतीनंतर आलेल्या आक्षेप / हरकतींचा विचार केला जाणार नसल्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

त्यानुसार प्राप्त झालेल्या हरकती/सुचना/ आक्षेप/ व तक्रारी विचारात घेऊन संदर्भीय शासन निर्णय, शासन शुध्दीपत्रक व शासन पुरकपत्रातील सुधारीत तरतुदीनुसार सर्वसाधारण बदल्या सन २०२३ साठी सहाय्यक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, वरिष्ठ सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक या संवर्गातील बदलीपात्र अधिकारी / कर्मचारी यांची दिनांक ३१/०५/२०२३ रोजीची सेवा गृहित धरुन तयार करण्यात आलेल्या अंतिम वास्तव्य ज्येष्ठता याद्या यासोबत प्रसिध्द करण्यात येत आहेत. सदरील वास्तव्य ज्येष्ठता याद्या संबधित अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून, त्यांच्या स्वाक्षरी घेवून त्या आपल्यास्तरावर दप्तरी ठेवण्यात याव्यात.

**सोबत : अंतिम वास्तव्य जेष्ठता यादी (०४)**

स्थळ प्रतीवर मा.मु.का.अ.यांची स्वाक्षरी असे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नांदेड करिता**